**पूर्णा मध्यम प्रकल्प ता. चांदूर बाजार जि. अमरावती या योजनेस चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता देण्या बाबत.**

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

महामंडळाचा निर्णय क्र. ९८२ /विपाविम/काता.४/ पूर्णा मध्यम प्रकल्प / चतुर्थ सुप्रमा/ (धारिका क्र.७/२०१८)/२०२१, दिनांक२९/०७/२०२१

**संदर्भ** :
१. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.
२. महामंडळाचा निर्णय क्र. विपाविम/ कातां ४/६५/पुर्णा मध्यम प्रकल्प/ तृतीय सुप्र.मा./ (धा.क्र.१८/१०)/२०१६, दिनांक २८/०३/२०१६.
३. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नासिक यांचे पत्र. क्र. रातांसस-(१)/ पुर्णा मप्र/ (धा.क्र.५४/ २०१८) /२१६/२०१९, दि. २६/०२/२०१९.
४. शासन पत्र क्र. बैठक-२०२०/ (२१/२०२०)/लपा, दि. ०३/०३/२०२० अन्वये प्राप्त अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.३१/०१/२०२० रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त.
५. मजनिप्राचे पत्र क्र.MWRRA/२०१९/PRCL/VIDC/११२/४४४, दिनांक ०२.०९.२०२०.
६. विपाविम नियामक मंडळाच्या दि. २९/१२/२०१९ रोजी झालेल्या ७९ व्या बैठकीतील ठराव क्र. ७९/३१
७. शासन निर्णय क्र.पाफेनि-२०२०/(प्र.क्र.१२०/२०)/मध्यम प्रकल्प, दिनांक १६.०३.२०२१
८. शासन पत्र क्र.सुप्रमा-२०१९/३८९/(प्र.क्र.१७१/१९)/म.प्र., दिनांक २२.०७.२०२१

*******

**प्रस्तावना :**

पूर्णा मध्यम प्रकल्प हा अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यातील विश्रोळी गावाजवळ पूर्णा नदीवर बांधण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पामुळे चांदुर बाजार तालुक्यातील ६२७५ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळत आहे. सदर प्रकल्प सिंचन अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्यातील आहे. पूर्णा मध्यम प्रकल्प, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती या योजनेस शासन परिपत्रक पीयुआर-१०९४/३४१/(७१/९४)/जसंअ, दिनांक ०८.०७.१९९४ अन्वये रु.३६४५.१८४ लक्ष (रुपये छत्तीस कोटी पंचेचाळीस लक्ष अठरा हजार चारशे फक्त) इतक्या किंमतीस (दरसूची १९९०-९१ वर आधारित) मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तद्नंतर योजनेच्या अंदाजित खर्चात वाढ झाल्यामुळे पुन्हा शासन निर्णय क्र.पूर्णा-१०१९६/१७७२/(३६२/१९)/म.प्र., दिनांक १३.०६.२००० अन्वये रु.१३२३३.०५४ लक्ष (रुपये एकशे बत्तीस कोटी तेहेतीस लक्ष पाच हजार चारशे फक्त) किंमतीस (दरसूची १९९८-९९ वर आधारीत) प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

त्यानंतर विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर निर्णय क्र.विपाविम/कातां.४/३८९२/पूर्णा/ द्वितीय सुप्रमा/ (१/२००५), दिनांक २८.१०.२००५ अन्वये रु.२१३१०.०० लक्ष (रुपये दोनशे तेरा कोटी दहा लक्ष फक्त) किंमतीस (दरसूची २००४-०५ च्या दरसूचीवर आधारित) द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. बांधकामाचे दरम्यान योजनेची अद्ययावत किंमत द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता किमतीच्या दहा टक्के याहून अधिक वाढत असल्यामुळे संदर्भ क्र. २ च्या महामंडळाच्या निर्णयानुसार नुसार २०१३-१४ चे दरसूची वर आधारित रु.२५९.३४ कोटी इतक्या किंमतीची तृतिय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

सदर प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील मौजे सोनोरी गावाच्या पुर्वेस लाभक्षेत्रपासुन १.५ की.मी. अंतरावर असलेल्या गणोजा गावातील भुगर्भिय पाणी पातळी खोल गेल्याने शेतक-यांना विहीरीद्वारे सिंचनास अडचणी येत आहे. तेथील शेतक-यांनी शेतीसाठी प्रकल्पाच्या कालव्याव्दारे पाणी उपलब्ध करुन द्यावे आशी मागणी केली होती. तथापि गणोजा गावाचे लाभक्षेत्र प्रकल्पाच्या इमामपूर वितरीका कालव्याच्या तलांकापेक्षा उंच असल्यामुळे भौगोलीक परीस्थीती लक्षात घेता त्यांची मागणी पुर्ण करता आली नाही. त्याचप्रमाणे लाभक्षेत्राचे खालील बाजुस असलेल्या नजरपुर व बेलोरा भागातील शेतक-यांना प्रकल्पीय नियोजनानुसार कालव्याद्वारे सिंचनाचा लाभ मिळत नाही. याबाबत नजरपुर, गणोजा व बेलोरा गावातील शेतक-यांनी तत्कालीन मा.आमदार श्री. बच्चुभाऊ कडु यांना निवेदन देवुन सिंचनाअभावि असलेल्या चिंतनीय स्थितीबाबत अवगत केले व पुर्णा प्रकल्पातुन या भागास सिंचनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी विनंती केली. शेतक-यांची मागणी लक्षात घेउन तत्कालीन मा. आमदार श्री. बच्चुभाऊ कडु यांनी या बाबतीत शासनास निवेदन देउन गणोजा, नजरपुर व बेलोरा या गावातील शेतक-यास पुर्णा प्रकल्पाचे पाणी सिंचनासाठी उपलब्ध करुन देण्याची विनंती केली.

या अनुषंगाने दि ०९/०८/२०११ रोजी मा. राज्यमंत्री, जलसंपदा विभाग, यांचे दालनात झालेल्या बैठकीत ता.चांदुर बाजार मधील गणोजा, नजरपुर व बेलोरा या गावातील शेतक-यांना पुर्णा प्रकल्पातुन सिंचन उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव सादर करण्यास सांगीतले. तसेच मा. मुख्यमंत्री महोदय यांचे संदर्भ क्रमांक १ मध्ये नमुद केलेल्या मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली विधान भवन, नागपूर येथे दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी झालेली अमरावती जिल्ह्याची आढावा बैठकीत गणोजा बेलोरा योजनेचा पुर्णा प्रकल्पाच्या आराखडयात समावेश करुन सुधारीत प्रशासकीय मान्यता घ्यावी असे निर्देश देण्यात आले असल्याने चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

संदर्भ क्रमांक ३ नुसार, पुर्णा मध्यम प्रकल्प ,ता.चांदुर बाजार, जि. अमरावती या प्रकल्पाच्या रु.३६८.६३ कोटी किंमतीचा चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्या दिनांक ०८.०२.२०१९ रोजी झालेल्या १२७ व्या बैठकीत राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिकच्या छाननी अहवालातील मुद्या क्र.१ ते २७ च्या अधीन क्लिअरन्स बाबतचा निर्णय झाला. छाननी अहवालातील मुद्या क्र.२६ व २७ मधील उपस्थित मुद्यांचे मुख्य अभियंता यांचेकडून प्राप्त अनुपालन महामंडळाने नियामक मंडळाच्या मा. सचिव उपसमितीच्या बैठकीसमोर ठेवण्यासाठी शासनास सादर करण्यात आला.

संदर्भ क्रमांक ४ नुसार, मा. सचिव उपसमितीच्या दिनांक ३१/०१/२०२० रोजी झालेल्या बैठकीत चर्चा होऊन, मा. सचिव, उपसमितीने राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या मुद्दा क्र. २७ मधिल उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन करणे व प्रकल्पाला महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता प्राप्त केल्यानंतर या प्रकल्पाचा चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव नियामक मंडळासमोर सादर करणे करिता सहमती दर्शविली आहे.

संदर्भ क्रमांक ५ नुसार, प्रकल्पाला महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे ईंग्रजी पत्र क्रमांक MWRRA/ २०१९ / PRCL/ VIDC/ ११२ /४४४, दिनांक ०२/०९/२०२० अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

संदर्भ क्रमांक ६ नुसार, दिनांक २९/१२/२०२० रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ७९ व्या बैठकीत पुर्णा मध्यम प्रकल्प, ता.चांदुर बाजार, जि. अमरावती या प्रकल्पाच्या रु.३६८.६३ कोटी किंमतीचा चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मान्यतेचा निर्णय नियामक मंडळाचा ठराव क्र.७९/३१ अन्वये झाला आहे. सदर ठराव खालीलप्रमाणे आहे.

ठराव क्रमांक ७९/३१ :- ठराव करण्यांत येतो की, "विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत पुर्णा मध्यम प्रकल्प ता. चांदुर बाजार जि. अमरावती या प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु. ३६८.६३ कोटी किंमतीच्या प्रस्तावास राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांनी दिलेल्या Clearance बाबतचा निर्णय तसेच मा.सचिव, उपसमितीने दि. ३१.०१.२०२० च्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अटीचे अधीन नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच, प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता बाबतचे आदेश, कार्यकारी संचालक यांनी, प्रकल्पाअंतर्गत नव्याने प्रस्तावित गणोजा बेलोरा ठीबक सिंचन योजनेस शासनाची तत्वत: मान्यता, प्रकल्पाचे फेर जलनियोजन प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर निर्गमित करणेकरिता नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

सदर ठराव दिनांक १२.०४.२०२१ रोजी झालेल्या ८० व्या बैठकीत कायम करण्यात आलेला आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली विधान भवन, नागपूर येथे दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या अमरावती जिल्ह्याच्या आढावा बैठकीत दिलेल्या निर्देशांचे अनुषंगाने पुर्णा प्रकल्पाच्या चतुर्थ सु.प्र.मा. प्रस्तावामध्ये गणोजा-बेलोरा उपसा सिंचन योजनेचा समावेश करण्यात आला होता. या अनुषंगाने नव्याने प्रस्तावित गणोजा बेलोरा ठीबक सिंचन योजना पुर्णा प्रकल्पाचा भाग म्हणुन अंतर्भुत करण्याबाबत संदर्भ क्र.८ अन्वये शासनाची तत्वत: मान्यता प्राप्त आहे. तसेच, प्रकल्पाचे फेर जलनियोजन प्रस्तावास संदर्भ पत्र क्र.७ अन्वये शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे.

सदर प्रकल्पाची तृतिय सुप्रमा किंमत रु. २५९.३४ कोटीच्या तुलनेत चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमत १०९.२९ कोटी ज्यास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | बाब | वाढ | मंजुर कीमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी | एकुण वाढीच्या तुलनेत टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | भुसंपादन (कलम १८/२८ अंतर्गत) | २०.४१ | ७.८७ | १८.७१ |
| २ | गणोजा – बेलोरा ठीबक सिंचन योजनेचा अंदाजित खर्च | ७१.४० | २७.५२ | ६५.३२ |
| ३ | इतर उपशिर्षा मधील कामे | ७.८४ | ३.०२ | ७.१७ |
| ४ | अनुषंगीक खर्च | ९.६३ | ३.७१ | ८.८ |
| | **एकुण** | **१०९.२९** | **४२.१२** | **१००** |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ निर्णय :**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये अमरावती जिल्हयातील पुर्णा मध्यम प्रकल्प, ता. चांदुर बाजार जि. अमरावती या प्रकल्पाच्या एकुण अंदाजित खर्च रु. ३६८.६३ कोटी (रु. तिनशे अडुसष्ट कोटी त्रेसष्ट लक्ष फक्त) किंमतीस चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रु ३२३.५कोटी (रु. तिनशे तेविस कोटी पन्नास लक्ष) कामाप्रित्यर्थ व रु ४५.१३ कोटी (पंचेचाळीस कोटी तेरा लक्ष) अनुषंगीक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाची सन २०१७-१८ या वर्षाच्या दरसुची प्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षावरील तरतुदीचा गोषवारा परीशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

१. ठळक बाबी

| | | |
|---|---|---|
| अ. योजनेचे सिंचन क्षेत्र | - | ८१७५ हेक्टर |
| ब. योजनेमुळे एकूण होणारा पाणीसाठा | - | ४१.७५ दलघमी |
| क. योजनेचे लाभ-व्यय गुणोत्तर | - | १.५२ |

२. हा निर्णय संदर्भ क्रमांक १च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. १.३ नुसार महामंडळास प्रदान केलेल्या अधिकारानुसार नियामक मंडळाच्या दि. २९/१२/२०२० रोजी संपन्न ७९ व्या बैठकीतील मान्य झालेल्या ठराव क्र. ७९/३१ चे अनुषंगाने सर्व बाबींची पुर्तता झालेली असल्यामुळे तसेच मा.सचिव उपसमितीने व रा.ता.स.स.च्या छाननी अहवालातील मुद्दा क्र. १ ते २७ मधील उपस्थित मुद्यांचे पुर्ततेच्या अटीसह निर्गमित करण्यात येत आहे.

३. या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र. आय ५ मुख्य लेखा शिर्ष "४७०१" मध्यम पाटबंधारे वरील भांडवली खर्च ८०- सर्वसाधारण, १९०- सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००) (०५), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०१ ५१०१) या लेखा शिर्षाखाली खर्ची घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजुर अनुदानातुन भागविण्यात यावा.

४. या योजनेस प्रदान केलेली चतुर्थ सुधारीत प्रशासकिय मान्यता ( ६/ 2021 ) या अनुक्रमांकावर नोंदवहित नोंदवण्यात आली आहे.

५. सदर चतुर्थ सुप्रमा खालील अटींच्या अधिन राहुन देण्यात येत आहे.

४.१ या प्रकल्पाबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशी कार्यवाही पुढे चालू ठेवावी. चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कारवाईस कोणतीही बाधा पोहोचणार नाही. सदर मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

४.२ आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय समावेश करण्यात येऊ नये.

४.३ प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. पाणीसाठ्याचा सिंचना करिता जास्तीत जास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा व त्यानुसार कामे/निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

४.४ सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन निधी वितरण अथवा अतिरिक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, CWC ची मार्गदर्शक तत्वे, वित्त अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपद्धती यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

४.५ राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी अहवालात नमूद मुद्दा क्रमांक २६ व २७ चे अनुपालन करण्याची जबाबदारी क्षेत्रीय अधिका-यांची राहील.

४.६ मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन करण्यात यावे.

४.७ प्रकल्पाचे काम नियोजनानुसार पूर्ण करण्यात यावे.

४.८ सदर महामंडळ निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

४.९ सदर निर्णय जलसंपदा विभागाचे wrd.maharashtra.gov.in या संकेत स्थळावरील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे मिनी वेब पोर्टलवर उपलब्ध करण्यात आला आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे अध्यक्ष यांचे आदेशानुसार.

**"मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य"**
**सहपत्र : परिशिष्ट -१**

**अधीक्षक अभियंता**
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ
**नागपूर**

प्रतिलिपी :- सहपत्रासह

१. खाजगी सचिव, मंत्री, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई – 32
२. प्रधान सचिव (ज.सं.प्र. व वि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-32,
३. सचिव (ज.सं.व्य. व ला.क्षे.वि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा) नागपूर.
६. वित्त विभाग,व्यम 2 मंत्रालय, मुंबई-32.
७. नियोजन विभाग, (कार्यासन १४३४) मंत्रालय, मुंबई-32
८. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती
९. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरवती
१०. मुख्य लेखा व वित्त अधिकरी, महामंडळ कार्यालय
११. अधिक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती
१२. जिल्हाधिकारी, अमरवती
१३. कार्यकारी अभियंता, मध्यम व लघु प्रकल्प विभाग, अमरावती
१४. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क कार्यालय, अमरावती
१५. चिशा कार्यासन, विपाविम संग्राहार्थ

परिशिष्ट -१

**पूर्णा मध्यम प्रकल्प ता. चांदूर बाजार जि. अमरावती या योजनेस चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता देण्या बाबत.**

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर**

महामंडळाचा निर्णय क्र. १४६ /विपाविम/काता.४/ पूर्णा मध्यम प्रकल्प / चतुर्थ सुप्रमा/ (धारिका क्र.७/२०१८)/२०२१, दिनांक ६/०६/२०२१

**उपशिर्षवार तरतुदी (दरसूची २०१७-१८)**

(किंमत रुपये कोटी)

| अ.क्र. | उपशिर्ष | तरतुद |
|---|---|---|
| | **I- मुख्य धरण** | |
| | ए-प्राथमिक | १.१० |
| | बी-भूसंपादन | १५.८ |
| | सी-मुख्यकामे | ११९.५४ |
| | आर –दळणवळण | ४.६८ |
| | के – इमारती | २.९१ |
| | एम – वृक्षसंवर्धन | ०.०८ |
| | ओ – संकिर्ण | १.१० |
| | पी – देखभाल | ८.८९ |
| | क्यू – हत्यारे अवजारे | ०.५८ |
| | आर - दळणवळण | १.१७ |
| | **एकुण (I)** | **१५५.८५** |
| | **II - कालवे** | |
| | अ – प्राथमीक | ०.९८ |
| | ब –भूसंपादन | २१.४९ |
| | सी - मुख्यकामे | १.२६ |
| | डी - -विमोचक | २.२४ |
| | इ-प्रपात | २.९९ |
| | एफ- RHT works | १.३० |
| | जी – पूल | १.८२ |
| | एच – एस्केप | ०.३५ |
| | के –इमारती | ०.८२ |

| अ.क्र. | उपशिर्ष | तरतुद |
|---|---|---|
| | एल – मातीकाम | ४.०३ |
| | एम-वृक्षारोपण | ०.०१ |
| | ओ – संकिर्ण | ०.२१ |
| | पि – निगराणी | ०.२४ |
| | आर – दळणवळण | ०.०८ |
| | III – वितरीका | १०५.७८ |
| | शेतचाऱ्या | २३.५६ |
| | डब्लू – ड्रेनेज | ०.४९ |
| | **एकुण (II + III)** | **१६७.६५** |
| | **एकुण बांधकामे** | **३२३.५०** |
| | अनुषंगीक खर्च | ४५.१३ |
| | **एकुण** | **३६८.६३** |

**"मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य"**

**अधीक्षक अभियंता**
**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ**
**नागपूर**